दै. सकाळ दि. 09/12/2019

दै. सकाळ दि. 09/12/2019

# मटकामाफिया कमल यादवला अटक

## रेल्वेस्थानक परिसरात सापळा लावून घेतले ताब्यात

**नांदेड, ता. ८ (बातमीदार)** : शहरातील मटकामाफिया व मोक्कातील फरार आरोपी कमल यादव याला रविवारी (ता. आठ) पहाटेच्या सुमारास रेल्वेस्थानक परिसरातून अटक केली. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

शहराच्या वजिराबाद परिसरात असलेल्या दिलीपसिंग कॉलनी भागात ता. पाच सप्टेंबरच्या रात्री हवेत गोळीबार करून दहशत पसरविली होती. या प्रकरणात वजिराबाद पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल केला होता. यातील शेख अन्वरअली अकबरअली, प्रदीप ऊर्फ सोनू लालचंद्र रैत्रे या दोघांना अटक केली होती. त्यानंतर समोर आलेल्या घटनाक्रमानुसार यात रणवीरसिंग ऊर्फ कालू ऊर्फ टायगर ऊर्फ शेरा ऊर्फ विलास ऊर्फ देविदास नामदेव पवार आणि विक्रम ऊर्फ विक्की नंदलाल यादव या दोघांना अटक केली. हे चारही जण सध्या कारागृहात आहेत.

या गुन्ह्यातील कमल गणेशलाल यादव हा फरार होता. या पाच आरोपींविरुद्ध विशेष पोलिस महानिरीक्षक मनोज लोहिया यांनी नांदेड पोलिसांच्या आलेल्या अहवालावरून महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक अधिनियमानुसार (मोक्का) लावण्याची परवानगी दिली. यावरून या आरोपींवर मोक्काअंतर्गत कारवाई करण्यात आली. मात्र, यातील कमल यादव फरार होता. त्याला अटक करण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक विजयकुमार मगर आणि अतिरिक्त पोलिस अधीक्षक दत्ताराम राठोड यांनी दिल्या. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शिवाजी डोईफोडे यांनी सहकारी सहायक पोलिस निरीक्षक सुनील नाईक यांनी आपल्या पथकासह कमल यादव याची माहिती गोळा केली. तो नांदेडात असल्याची माहिती त्यांना मिळताच या पथकाने नांदेडच्या रेल्वेस्थानक परिसरात सापळा लावून कमल यादव याला अटक केली. तो सप्टेंबरपासून फरार होता. याला वजिराबाद पोलिस निरीक्षक संदीप शिवले यांच्या ताब्यात दिले आहे. या प्रकरणाचा तपास उपविभागीय अधिकारी अभिजित फस्के करीत आहेत.